मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४ ई मेल: sopr२.rdd-mh@nic.in

क्रमांक: ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१५९/ई-१४७२३३४/पं.रा.-२ दिनांक : २३ जानेवारी, २०२६

प्रति,

(१) सर्व विभागीय आयुक्त,
(२) सर्व जिल्हाधिकारी,
(३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

विषय:-माहे जानेवारी, २०२६ ते डिसेंबर, २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीवर "प्रशासक" नेमणेबाबत.

संदर्भ:- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. CIVIL PIL CJ-LD-VC-48 OF 2020, दिनांक १४ ऑगष्ट, २०२० रोजीचे आदेश.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी मा. उच्च न्यायालयाच्या संदर्भाधीन आदेशाचे कृपया अवलोकन व्हावे.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी संदर्भाधीन जनहित याचिकेवरील सुनावणीअंती पारित केलेल्या दिनांक १४ ऑगष्ट, २०२० रोजीच्या आदेशात मुदत संपलेल्या तथा मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीवर "प्रशासक" नियुक्तीबाबत अनुमती दिलेली आहे.

३. मा. उच्च न्यायालयाचे सदरहू आदेश विचारात घेवून, माहे जानेवारी, २०२६ ते माहे डिसेंबर, २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींवर नियमानुसार निवडणूक होऊन, ग्रामपंचायत अस्तित्वात येईपर्यंत, नियमानुसार "प्रशासक" नियुक्तीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदरहू, कार्यवाही करताना मा. उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही, याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी, ही विनंती.

आपला,

BABURAO MAHADU ASOLE

Digitally signed by BABURAO MAHADU ASOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=dd67f0d38c29ae85f8559e65d2f9d423f04fabb3383af844cc7c057d58b4167a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EEFD6CD19B53F91B65DAD89AA72A32B839329DB6184840A0F533230BD96705E, cn=BABURAO MAHADU ASOLE
Date: 2026.01.23 16:56:11 +05'30'

(वा. म. आसोले)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:

(१) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक.
(२) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
(३) अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय.
(४) कार्यासन पंचायत राज-२, निवडनस्ती.